# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई-400 703.
**M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,**
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-


क्र. मुंविमं/माध्य.गोप./३०१/१६९
नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक : ०८/०४/२०२२

**प्रति,**

मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा
जिल्हा ठाणे/रायगड/पालघर/मुंबई

**विषय :-** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च/एप्रिल -२०२२ उत्तरपत्रिकांचे पार्सल न स्वीकारणे / न तपासणेबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च/एप्रिल - २०२२ करिता आपल्या शाळेच्या शिक्षकांना परीक्षक / नियामक म्हणून नियुक्ती देण्यात आली होती.

याबाबत विभागीय मंडळ कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच परीक्षक / नियामक यांनी उत्तरपत्रिकांचे परीक्षण / नियमन करण्यास नकार कळविला आहे. सदर बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे.

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवाशर्ती) नियमावली १९८१ मधील नियम २२ (१) (२) एम आणि २२ (१) (४) (१९) नुसार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने आयोजित केलेल्या परीक्षेच्या कामासाठी शिक्षकांना नियुक्त केल्यास ते काम संबंधित शिक्षकाने स्वीकारणे बंधनकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १२ जानेवारी, २००१ व २८ एप्रिल २००३ च्या असाधारण प्राधिकृत प्रकाशनाद्वारे जाहीर केलेल्या आदेशान्वये माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांची सेवा ही अत्यावश्यक सेवेमध्ये समाविष्ठ केलेली असल्याने कोणत्याही शिक्षकाचा परीक्षक / नियामक म्हणून काम करण्यास नकार स्वीकारला जाणार नाही याची जाणीव संबंधित सर्व शिक्षकांना करून द्यावी.

उत्तरपत्रिका तपासुन घेण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांची असून त्यानुसार मंडळाकडे विहीत कालावधीत पाठवणे हे सुध्दा शासनाच्या निर्देशानुसार आपले कर्तव्य आहे. सदर उत्तरपत्रिका न स्वीकारल्यास आपल्या शाळेची मंडळ मान्यता रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तद्नंतर ही आपल्या शाळेतील काही शिक्षकांनी उत्तरपत्रिका तपासणी कामात नकार दिल्याचे मंडळाच्या निदर्शनास आले आहे. याबाबत आपणास निर्देशीत करण्यात येते की, ज्या शाळेतून उत्तरपत्रिका न तपासता अथवा न स्वीकारता परत येतील अशा सर्व शाळेतील मार्च / एप्रिल -२०२२ प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचा निकाल राखीव ठेवण्यात येईल आणि विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित मुख्याध्यापक व्यक्तिशः जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

(नितीन उपासनी)
विभागीय अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३